खरीप पणन हंगाम २०१९-२० तसेच रबी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये खरेदी केलेल्या धानाच्या भरडाईबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:-धानभ-१२१९/प्र.क्र. ११५/नापु-२९
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : - ८ नोव्हेंबर, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांक: खरेदी १११५/प्र.क्र.१७/ना.पु.२९, दि.१४ .०१.२०१६.
२) शासन शुद्धिपत्र क्रमांक : क्र. १०१४/२८/प्र.क्र. १७/नापु २९, दि. ०३.११.२०१७
३) शासन निर्णय क्रमांकः खरेदी - १०१९/प्र.क्र.९८/ ना.पु.२९ दि. ०९ सप्टेंबर, २०१९

शासन परिपत्रक :-

खरीप पणन हंगाम २०१९-२०२० तसेच रबी पणन हंगाम २०२०-२१ करिता किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत "विकेंद्रीत खरेदी योजना " संपूर्ण राज्यात राबविण्याचे संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदर योजनेंतर्गत खरेदी होणाऱ्या धानाची भरडाई खरेदीबरोबरच सुरु करणे आवश्यक आहे. धानाची भरडाई ही अभिकर्ता संस्थेने (दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई व महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक) केंद्र शासनाच्या विहित मापदंडानुसार करावयाची आहे.

उपरोक्त योजना सक्षमपणे राबविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

२) भरडाईचा कालावधी :

खरेदीचा कालावधी दि.१ ऑक्टोबर, २०१९ ते दि. ३१ मार्च २०२०, तसेच दि. १ मे २०२० ते दि. ३० जून, २०२० असल्यामुळे विहित मुदतीत भरडाई पूर्ण करण्याची दक्षता अभिकर्ता संस्थांनी घ्यावी. धान भरडाईचे काम लवकरात लवकर व शक्यतो **धान खरेदीच्या दिनांकापासून एका महिन्यांत अथवा उशीरात उशीरा दिनांक ३१ जुलै, २०२० पर्यंत पूर्ण करावे.** त्यादृष्टीने अभिकर्ता संस्थांनी आवश्यक ते पूर्वनियोजन करावे.

३) भरडाईसाठी जिल्हा समन्वय समिती :-

जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील अभिकर्ता संस्थांच्या मदतीने खालीलप्रमाणे जिल्हा समन्वय समिती स्थापन करण्याची कार्यवाही करावी:-

जिल्हाधिकारी	अध्यक्ष
जिल्हा पुरवठा अधिकारी	सदस्य
सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी	सदस्य
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था	सदस्य
मार्केटिंग फेडरेशन /आदिवासी विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक	सदस्य-सचिव

४) **जिल्हा समन्वय समितीच्या जबाबदाऱ्या :-**

i. धान खरेदी सुरु झाल्यानंतर खरेदी केलेल्या धानाच्या भरडाईकरिता खरेदी केंद्राजवळील, सक्षम अशा गिरणीधारकांची नियुक्ती करावी.

ii. शक्यतो स्थानिक गिरणीमालकांचा प्राथम्याने विचार करावा. तथापि ज्या भागामध्ये धान भरडाई गिरण्यांची संख्या कमी आहे व लगतच्या जिल्ह्यातील गिरणीधारकांना भरडाईचे काम देणे शासनाच्या हिताचे असल्यास समितीने त्यांच्या स्तरावर अशा प्रकारे गिरणीधारकांची नियुक्ती करण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

iii. मागील हंगामात ज्या मिलर्सनी सक्षमरित्या भरडाई केली असेल, त्यांची चालू हंगामासाठी नियुक्ती करताना त्यांच्या करारनाम्याचे नुतनीकरण करुन भरडाईचे काम देण्यास जिल्हा समन्वय समिती सक्षम राहील.

iv. मिलर्सची नियुक्ती करताना त्याच्या मालकीची मिल असल्याबाबतचे सबळ पुरावे घेण्यात यावेत. जसे मिलचे SSI नोंदणी प्रमाणपत्र,कृषि उत्पन्न बाजार समितीचे मान्यता असल्याचे प्रमाणपत्र, गिरणीच्या नावाचे मागील ३ महिन्यांचे विद्युत देयक, मागील ३ वर्षाचे Audited Statement (ज्यामध्ये Net Worth Positive असावी), GST Registration व मागील कोणत्याही हंगामाचे धान /सीएमआर (Custom Milled Rice) बाकी नाही व शासनाला कोणतीही रक्कम देय नाही, अशा आशयाचे ₹ १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र घेण्यात यावे.ज्या मिलर्सना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे तसेच ज्यांच्याकडे मागील हंगामाचे धान / सीएमआर (Custom Milled Rice) शिल्लक आहे, अशा मिलर्सला भरडाईचे काम देण्यात येऊ नये. तसेच कोणत्याही परिस्थितीत sortex /parboiled प्रकारच्या गिरणींची निवड करण्यात येऊ नये.

v. ज्या मिलर्सवर अभिकर्ता संस्थांनी एफआयआर दाखल केला असेल व त्याअनुषंगाने चौकशी सुरु असेल, अशा मिलर्सला भरडाईचे काम देण्यात येऊ नये.

vi. वितरण आदेश दिल्याच्या दिनांकापासून धानाची भरडाई करुन सीएमआर १५ दिवसांत शासनाच्या विहीत केलेल्या गोदामात जमा होत आहे, याची खातरजमा समितीने संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या मार्फत करावी.

vii. राज्यशासनाच्या विहीत केलेल्या गोदामामध्ये सी.एम.आर. जमा केल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सी.एम.आर. प्रतिपुर्ती दावे वित्तीय सल्लागार व उपसचिव यांना online सादर केले आहेत किंवा कसे याबाबत समितीने आढावा घ्यावा. त्यामध्ये वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाच्या खाते क्रमांकांचा तपशिल खालीलप्रमाणे नमूद करण्याबाबत सूचना द्याव्या.

"Accounts Officer, Civil Supplies, Axis Bank, New Marin Lines,
खाते क्र.२३३०१०२००००६४८, IFSC Code-UTIB००००२३३
प्रतिपूर्तीची रक्कम सदरहू खात्यामध्ये वर्ग केली जात असल्याबाबत समितीने पाक्षिक आढावा घ्यावा."

viii. ॲडव्हान्स सीएमआर जमा केल्यानंतर संबंधित मिलरकडून धान उचलले जात आहे किंवा नाही याची तपासणी अभिकर्ता संस्थांनी केली आहे किंवा कसे याचा पाक्षिक आढावा घ्यावा.

ix. खरीप पणन हंगाम २०१९-२० व रबी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये मिलर्सना धान भरडाईकरिता देताना एका मिलरला एका वेळी एका अभिकर्ता संस्थेकडून प्रत्येकी १० पेक्षा जास्त लॉट भरडाईकरिता देण्यात येऊ नयेत याची दक्षता घेण्याबाबत समितीस अहवाल सादर करण्याबाबत अभिकर्ता संस्थांना सूचना द्याव्या.

x. गिरणीधारकांच्या भरडाईबाबत तक्रारी असल्यास त्यासंदर्भात जिल्हा समन्वय समितीने सुनावणी घेऊन निर्णय द्यावा. समितीचा निर्णय मान्य नसल्यास गिरणीमालकास संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडे अपील दाखल करता येईल. विभागीय आयुक्त स्तरावरील निर्णय अंतिम राहील.

xi. जिल्हा समन्वय समितीने त्यांची आढावा बैठक दर १५ दिवसांनी घ्यावी.

xii. केंद्र शासनाच्या निदेशांप्रमाणे खरेदी झालेल्या धानाची भरडाई विहित मुदतीत होणे आवश्यक आहे. खरेदी केलेले धान उघड्यावर अथवा गोदामांमध्ये २ महिन्यांहून अधिक काळ शिल्लक राहणार नाही याची दक्षता जिल्हा समन्वय समितीने घ्यावी. तशी परिस्थिती असल्यास लगतच्या जिल्ह्यांतील गिरणीधारकांकडून भरडाई करुन घेण्याबाबत निर्णय घेण्यास सदर समिती सक्षम राहील.

xiii. गिरणीमालकाने NeML च्या प्रणालीवर योग्य नोंदी घेतल्या आहेत किंवा कसे याचा आढावा अभिकर्ता संस्थांनी घेणे आवश्यक आहे. तसेच त्यानंतर शासकीय गोदामात सी.एम.आर. प्राप्त झाल्यानंतर व तो नियतनासाठी पाठविल्यानंतर गोदामपालाकडून त्याच्या संगणकीय अद्ययावत नोंदी NeML च्या प्रणालीवर घेण्यात आल्या आहेत किंवा कसे याचा आढावा जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी घ्यावयाचा आहे. (नोंदी न घेतलेल्या गिरणीमालकावर अभिकर्ता संस्थेने व गोदामपालावर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी कारवाई करावी.) त्याबाबत देखील पाक्षिक बैठकीमध्ये आढावा घेण्याची जबाबदारी समितीची राहील.

५) **अभिकर्ता संस्थेची जबाबदारी:-**

i. गिरणीमालकांची नियुक्ती विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन जिल्हा समन्वय समितीच्या मान्यतेने करण्यात यावी.

ii. काळ्या यादीत समाविष्ट केलेल्या गिरणीधारकांची यादी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा समन्वय समितीस नवीन हंगामाच्या मिलर्सची नियुक्ती होण्यापुर्वी पाठविण्यात यावी.

iii. काळ्या यादीत समाविष्ट केलेल्या व नवीन हंगामात नियुक्ती न दिलेल्या मिलर्सच्या मिलवर शासनाचे धान जाणार नाही याची जबाबदारी अभिकर्ता संस्था यांची राहील.

iv. जिल्हा समन्वय समितीने नियुक्त केलेल्या गिरणीधारकांसोबत अभिकर्ता संस्थेने व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी एकत्रीत करारनामा करावा. (Tri Party Agreement)

v. फक्त गिरणीमालकांशीच करारनामा करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत ट्रेडर्स अथवा अन्य नावांखाली व्यवसाय करणाऱ्यांशी करारनामा करु नये.

vi. अभिकर्ता संस्थेने गिरणीमालकांशी करारनामा करताना हंगाम नमूद करणे आवश्यक राहील.

vii. खरेदी केलेल्या धानाच्या भरडाईच्या अनुषंगाने अभिकर्ता संस्थेस मदत करण्याची जबाबदारी जिल्हा समन्वय समितीची असेल. मात्र, धान खरेदी करुन त्या खरेदी

केलेल्या धानाची भरडाई करुन सी.एम.आर. संबंधित गिरणीमालकामार्फत विहित शासकीय गोदामात जमा होईपर्यंत संपूर्ण जबाबदारी अभिकर्ता संस्थेची आहे.

viii. भरडाईसाठी धानाची उचल करणे तसेच, धान भरडाई केल्यानंतर तात्काळ सी.एम.आर. शासकीय गोदामामध्ये जमा करणे हे गिरणीमालकास बंधनकारक आहे. त्यानुसार कालबध्द कार्यक्रम आखून देण्यात आलेला आहे, त्याचे पालन गिरणीमालकांकडून न झाल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याच्या स्पष्ट तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे अभिकर्ता संस्थांनी कार्यवाही करावी.

ix. धानाचे वितरण आदेश (D.O.) धान खरेदी केलेल्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत नियुक्त केलेल्या मिलरला देण्यात यावेत.

x. केंद्र शासनाने भरडाईचा कालावधी निश्चित करुन दिला आहे. त्या मुदतीत भरडाई करुन घेण्याची दक्षता अभिकर्ता संस्थेने घ्यावी.

xi. अभिकर्ता संस्थांनी प्रत्येक आठवडयाच्या अखेरीस भरडाईसाठी दिलेले धान व शासकीय गोदामात जमा केलेला सीएमआर यांचे एकत्रित जिल्हानिहाय विवरणपत्र पोच पावतीसह (Acceptance Receipt) वित्तीय सल्लागार व उप सचिव, मुंबई यांना पाठवावे.

xii. व्यवस्थापकीय संचालक, मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळ, यांनी या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही होत असल्याचा नियमितपणे आढावा घ्यावा. शेतकऱ्यांना धान चुकारे प्रदान करणे, खरेदी केंद्रावरून गिरणीमालकांना विहीत मुदतीत धान उपलब्ध करुन देणे व यादरम्यान शासनाचे नुकसान होणार नाही, हे कटाक्षाने पहावे.

xiii. सी.एम.आर. जमा करतांना गिरणीपासून कमीत कमी अंतरावरील नजीकच्या शासकीय गोदामामध्ये सी.एम.आर. जमा करण्याबाबत गिरणीधारकांना सूचना देण्याची जबाबदारी सदर समितीची राहील.

xiv. गिरणीमालकाने धानाची भरडाई करुन तांदूळ (सी.एम.आर.) शासकीय गोदामात जमा केल्यानंतर गोदामपालाने NeML च्या संगणकीय प्रणालीवर त्याबाबत घेतलेल्या नोंदीच्या आधारे अभिकर्ता संस्थेने पुढील धान गिरणीमालकास उपलब्ध करुन द्यावा.

xv. भरडाईचा कालावधी संपल्यानंतर जर अभिकर्ता संस्थांकडे धान शिल्लक राहिले तर शिल्लक धानाची संपूर्ण जबाबदारी अभिकर्ता संस्थांची राहील. सदर धानाच्या खरेदीचा कोणताही अनुषंगीक खर्च अभिकर्ता संस्थांना अनुज्ञेय नसेल. तसेच, सदर धानापासून जेवढा सीएमआर झाला असता तेवढया सीएमआरची केंद्र शासनाने त्या त्या कालावधीसाठी निश्चित केलेल्या इकॉनॉमिक कॉस्टच्या दराने होणारी रक्कम अभिकर्ता संस्थांनी शासनास जमा करावी. अशी सर्व रक्कम जमा होईपर्यंत अभिकर्ता संस्थांचा प्रशासकीय/अनुषंगिक खर्च प्रदान केला जाणार नाही.

xvi. अभिकर्ता संस्थेने मिलर्सकडे भरडाईसाठी धान सोपविताना खालीलप्रमाणे प्राथम्यक्रम असावा.

a) उघडयावर साठविलेले (अपवादात्मक परिस्थिती असल्यास) असे धान.

b) खाजगी गोदामात साठविलेले धान.

c) सहकारी संस्थांच्या गोदामात साठविलेले धान.

d) शासकीय /अभिकर्ता संस्थांच्या गोदामात साठविलेले धान.

तसेच महिनानिहाय साठा विवरणपत्रे online अद्ययावत ठेवण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे

xvii. धान भरडाईनंतर जास्तीत जास्त सी.एम.आर. (म्हणजेच ६७% तांदूळ) जमा करण्यास तयार असणाऱ्या गिरणीमालकांना प्राधान्य देण्यात यावे.

xviii. वाढीव मुदत देऊनही भरडाई न केल्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे अशा गिरणीमालकास भरडाईचे काम देऊ नये.

xix. करारनाम्याप्रमाणे गिरणीमालकांकडून बँक गॅरंटी घेणे.

xx. भरडाई क्षमता (Milling capacity) व वाहतूकीसाठी जवळच्या अंतराचा प्रामुख्याने विचार करावा.

xxi. गिरणीधारकाची भरडाई क्षमता लक्षात घेऊन त्याला पूर्ण हंगामात किती धान दिले जाईल व हे दिलेले धान हंगामापूर्वी विहित मुदतीत भरडाई करुन दिले जाईल याची हमी गिरणीधारकाकडून घेण्यात यावी. तसेच प्रति क्विंटल धान भरडाईकरिता सर्वसाधारणपणे १.५ युनिट वीज खर्च होत असल्याने गिरणीधारक व ट्रेडर्स/अन्य नावांखाली व्यवसाय करणाऱ्यांमधील फरक जाणून घेण्याकरिता सदर बाबीच्या आधारे शहानिशा करावी.

xxii. कार्यरत खरेदी केंद्र, त्याची खरेदी क्षमता, त्या केंद्राला जोडण्यात आलेले भरडाईचे उद्दिष्ट या बाबतची माहिती नियंत्रण कक्षाला देण्यात यावी.

xxiii. गिरणी मालकाने भरडाई केलेला सी.एम.आर शासकीय गोदामात जमा करून देयक सादर करताच, अभिकर्ता संस्थेने १० दिवसात, भरडाई खर्च विहित दराने गिरणीमालकास द्यावा.

xxiv. गिरणीमालकांकडून धानाची भरडाई करुन संबंधित गिरणीमालकामार्फत सी.एम.आर. विहित शासकीय गोदामात जमा करणे.

xxv. अभिकर्ता संस्था यांनी धान वाहतुकीचे देयक वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्या कार्यालयास सादर करताना जवळच्या मिलकरीता व जवळच्या मार्गाने वाहतूक केल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

xxvi. संबंधित गिरणीमालकामार्फत विहित कालावधीत सी.एम.आर. विहित शासकीय गोदामात जमा न केल्यास/ धान उचलण्यास विलंब झाल्यास करारनाम्यामध्ये दंडात्मक तरतूद ठेवावी. तसेच, याबाबतचे वितरण आदेश (डी.ओ.) देयकासोबत तपशिलवार कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक राहील.

६) **गिरणीमालकांची जबाबदारी :-**

i. अभिकर्ता संस्था/डीएमओ/आरएमओ यांनी मिलर्सला वितरण आदेश (DO) दिल्यावर गिरणी मालकाने धानाची १० दिवसांच्या आत उचल करणे आणि त्यानंतर १५ दिवसांत भरडाई झालेला सीएमआर शासकीय गोदामात जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी गिरणी मालकाची राहील. अन्यथा गिरणीमालक शासनाने विहित केलेल्या प्रमाणात दंडास पात्र राहील.

ii. उचल केलेल्या धानाच्या वाहतूकीदरम्यान किंवा गिरणीमधील सुरक्षिततेसाठी, तसेच सी.एम.आर. वजन करुन वाहनामध्ये भरण्याची जबाबदारी गिरणीमालकाची असेल त्यासाठी, ते प्रसंगी विमा उतरवतील. मात्र त्यासाठी शासनाकडून खर्च दिला जाणार नाही.

iii. गिरणीमध्ये आवक झालेले धान तसेच गोदमामध्ये पाठविण्यात आलेला सी.एम.आर. यांच्या NeML च्या प्रणालीवर अद्ययावत नोंदी ठेवण्याची जबाबदारी गिरणीमालकाची राहील.

iv. संबंधित गिरणीमालकाने सी.एम.आर. जमा केल्याची पोहोच (Acceptance Receipt) लगेच व उशिरात उशिरा दोन दिवसांत अभिकर्ता संस्थेकडे जमा करावी.

v. भरडाई केंद्रावर FCI च्या निर्देशानुसार २७ मे.टन चा लॉट बनविण्यात यावा.

vi. भरडाई केंद्रावर CCTV कॅमेरा लावून त्याचे रेकॉर्डिंग मागणी केल्यास शासनास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित गिरणीधारकांची राहील.

७) खरीप पणन हंगाम २०१९-२० व रबी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये धानाच्या भरडाईसाठी खालील सूचना केंद्र शासनाच्या आदेशांच्या अधिन राहून देण्यात येत आहेत. केंद्र शासनाचे यासंदर्भातील सर्व आदेश अभिकर्ता संस्थेवर व मिलर्सवर बंधनकारक राहतील.

i. **उतारा:-**

एक क्विंटल धानाच्या भरडाईतून कमीत कमी ६७% (६७ किलो) तांदूळ (सी.एम.आर.) प्राप्त झाला पाहिजे.

ii. **धानाची भरडाई:-**

राज्यात लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत तांदूळ वितरीत होत असल्यामुळे, आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या धानाची तांदळासाठी (सी.एम.आर.) भरडाई करण्याची कार्यवाही करावी.

iii. **भरडाईचा दर**:-

केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात आलेले भरडाई दर सन २०१९-२० या हंगामासाठी लागू राहतील.

iv. **धानाची हाताळणूक:**

धानगिरणीमधील धानाची उतराई, हाताळणूक व भरडाई, तसेच केंद्र शासनाने खरीप पणन हंगाम २०१९-२० व रबी पणन हंगाम २०२०-२१ करिता बारदान्यांकरिता निश्चित केलेल्या निकषांमध्ये बसणाऱ्या गोण्यांमध्ये, दुहेरी शिलाईसह, सी.एम.आर. (तांदूळ) भरणे, तसेच सी.एम.आर. वजन करुन वाहनामध्ये भरण्याची जबाबदारी गिरणी मालकाची असेल. यास्तव सुरक्षिततेसाठी ते प्रसंगी विमा उतरवतील, मात्र त्यासाठी शासनाकडून कोणताही वेगळा खर्च धान गिरणीमालकांना अनुज्ञेय असणार नाही.

८) **धान व सी. एम. आर. च्या वाहतूकीची जबाबदारी:-**

खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या धानाची वाहतूक करुन ते धान गिरणीमध्ये नेण्याची व भरडाईअंती प्राप्त झालेला सी. एम. आर.(तांदूळ) विहीत केलेल्या शासकीय गोदामापर्यंत पोहचविण्याची सर्वस्वी जबाबदारी गिरणी मालकाची राहील.

९) **बारदाना :-**

खरीप पणन हंगाम २०१९-२० व रबी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये, बारदाना खरेदी व वापराबाबत शासन निर्णय, क्रमांक: खरेदी १०१९ /प्र.क्र.९८/नापु २९, दि. ०९ सप्टेंबर, २०१९ मध्ये नमूद अटी शर्तीनुसार कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्या पत्र क्र. वि स उ स/का.२/खरेदी/ २०१९-२० दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ अन्वये जुन्या व नव्या बारदान्यासंदर्भातील देण्यात आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी. (जोडपत्र - ७)

तसेच बारदान्याच्या कलर कोडींग बाबत शासन निर्णय, क्रमांक: खरेदी १०१९/ प्र.क्र.९८/ नापु २९, दि.०९ सप्टेंबर, २०१९ मधील सूचनांचे पालन करावे.

१०) भरडाई दरम्यान मिळणारा ब्रान, भूसा इत्यादी सर्व उत्पादने गिरणीमालकाकडे राहतील. त्यासाठी कोणतीही रक्कम त्यांचेकडून वसूल केली जाणार नाही.

११) भरडाई करताना रबरी रोलरने ५% ते ७% पॉलिश अपेक्षित आहे.

१२) केंद्र शासनाने खरीप हंगाम २०१८-१९ व रबी पणन हंगाम २०२०-२१ साठी ठरविलेल्या सोबतच्या जोडपत्र-३ व जोडपत्र - ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, जमा करावयाचा सी.एम.आर. एफ.ए.क्यू. विनिर्देशात बसणारा असला पाहिजे.

१३) **सी.एम.आर. स्विकृतीचा आगाऊ कार्यक्रम :-**

दोन्ही अभिकर्ता संस्था व जिल्हाधिकारी यांनी संयुक्तपणे नियुक्त केलेले गिरणीमालक पुढील आठवडयाचे प्रत्येक तारखेस सी.एम.आर. तांदळाची किती वाहने विहित शासकीय गोदामात जमा करण्यासाठी पाठविणार यांची आगाऊ माहिती (गिरणीनिहाय ॲडव्हान्स प्रोग्राम) जिल्हा पुरवठा अधिकारी यांना द्यावी व त्यासाठी संबंधितांची त्वरीत मान्यता (Confirmation) घ्यावी व अशा मान्यतेनुसार त्या-त्या तारखेस ठरविल्यानुसार वाहने पाठवावीत. अशा मान्य झालेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार गिरणीनिहाय **संबंधित गिरणीमालकामार्फत** विहित शासकीय गोदामात सी.एम.आर. जमा करण्यात यावा. ज्या प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून सी.एम.आर. जमा करून घेण्यास विलंब झालेला आहे, अशा प्रकरणी संबंधित जिल्हा मार्केटिंग अधिकारी/ प्रादेशिक व्यवस्थापक यांनी विनिर्दिष्टपणे प्रकरणनिहाय नोंद ठेवावी. अशी कार्यवाही केल्यामुळे ज्या प्रकरणी गिरणीमालकाच्या चुकीशिवाय सी.एम.आर. जमा करण्यास विलंब झालेला असेल, अशा प्रकरणी गिरणीमालकावर दंडात्मक कारवाई होणार नाही. **मात्र, ज्या प्रकरणी विलंबाने सी.एम.आर. जमा करण्यास गिरणीमालक जबाबदार असेल अशा प्रकरणी गिरणीमालकावर** सी.एम.आर. च्या **किंमतीच्या १५% दराने व्याज आकारणी करण्यात यावी.** असा दंड/ व्याजाची वसुली असल्यास संबंधित अभिकर्ता संस्थांनी ही वसुली करुन वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्याकडे जमा करावी. मात्र शासकीय गोदामात सी.एम.आर.जमा होण्यासाठी झालेल्या विलंबाकरीता कोणतीही नुकसान भरपाई गिरणीमालकाला देय असणार नाही. यासंदर्भात दिनांकनिहाय देऊ केलेली वाहने, जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी मान्यता दिलेली वाहने, प्रत्यक्षात पाठविलेली वाहने, जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी स्विकारलेली वाहने व शिल्लक वाहने यांची माहिती दर आठवडयास अभिकर्ता संस्थांनी online जिल्हाधिकाऱ्यांना व शासनास न चुकता सादर करावी.

१४) संबंधित **गिरणीमालकाने** सी.एम.आर. जमा केल्याची पोहोच (Acceptance Receipt) **लगेचच किंवा उशिरात उशिरा दोन दिवसांत** अभिकर्ता संस्थांकडे जमा करावी. खरेदी केलेल्या धानाची भरडाई करुन तयार होणारा सी.एम.आर. जमा केल्याबाबतची पोहोच देताना **जिल्हा पुरवठा अधिकारी/सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सी.एम.आर.प्रत्यक्षपणे राज्य शासनाच्या विहित गोदामांत जमा झाल्याची खात्री करावी.** मात्र, सदर योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या धानाची भरडाई करुन सी.एम.आर. विहित शासकीय गोदामात जमा करण्याबाबतची संपूर्ण जबाबदारी अभिकर्ता संस्थांचीच राहील.

अभिकर्ता संस्थांनी **प्रत्येक आठवडयाच्या अखेरीस** भरडाईसाठी दिलेले धान व विहित शासकीय गोदामात जमा केलेला सी.एम.आर. यांचे जिल्हानिहाय एकत्रित विवरणपत्र पोच पावतीसह (Acceptance Receipt) वित्तीय सल्लागार व उप सचिव, मुंबई यांच्याकडे पाठवावे तसेच त्याची प्रत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवावी. अभिकर्ता संस्थांनी सादर केलेले एकत्रित विवरणपत्र व पोच पावतीच्या (Acceptance Receipt) आधारे भरडाई खर्चाची प्रतिपूर्ती वित्तीय सल्लागार व उप सचिव, मुंबई यांनी करावी. अभिकर्ता संस्थांमार्फत सी.एम.आर. शासकीय गोदामात जमा केल्यास सी.एम.आर. दाव्यांच्या प्रतिपूर्तीसाठी, अभिकर्ता संस्थेने वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१५) बँक गॅरंटी व इसारा रक्कम -

i. **इसारा रक्कम व अनामत रक्कम** -
भरडाईसाठी तयार असलेल्या गिरणीमालकांकडून रुपये ५०,०००/- इसारा रक्कम तसेच, अशा गिरणीमालकांना एकूण भरडाईसाठी मंजूर केलेल्या धानासाठी लागणारा भरडाई खर्च अधिक धान भरडाईसाठी होणारा अंदाजित वाहतूक खर्च या दोहोंच्या एकूण किंमतीच्या ५% अनामत रक्कम अभिकर्ता संस्थेकडे राष्ट्रीयकृत बँकेच्या नावे, धनादेशाद्वारे किंवा online जमा करणे आवश्यक राहील.

ii. अभिकर्ता संस्थांनी सर्व गिरणीमालकांकडून किमान एक वर्षासाठी राष्ट्रीयकृत (Nationalized) अथवा अनुसूचित (Scheduled) बँकेची बँक गॅरंटी घ्यावी व अंतिम हिशोब पूर्ण होईपर्यंत गॅरंटीची मुदत आणि वैधता (Validity) पुरेशी व वेळीच वाढवून घ्यावी.

iii. गिरणी मालकांनी सादर केलेली बँक गॅरंटीची सत्यता संबंधित बँकेकडून पडताळून घेणे अनिवार्य राहील.

iv. गिरणीधारकास बँक गॅरंटी अभिकर्ता संस्थेकडे करारनामा करण्यापूर्वी द्यावी लागेल.

v. सुरक्षा अनामत व बँक गॅरंटी भरडाईचा व्यवहार पूर्ण झाल्यावर परत करण्यात येईल, त्यावर व्याज अनुज्ञेय असणार नाही.

vi. गिरणीधारकांकडून केंद्र शासनाने संबंधित हंगामाकरिता विहित केलेल्या Cost Sheet मधील तांदळाच्या (CMR) Acquisition Cost च्या ६७% एवढ्या निश्चित केलेल्या रकमे एवढी रक्कम बँक गॅरंटी म्हणून जमा करून घ्यावी.
(बँक गॅरंटी = ACQUISITION COST OF 1 QUINTAL OF RICE AS PER COST SHEET FOR KMS 2019-20 X 67/100)

vii. बॅक गॅरंटी ऐवजी एफडीआर/टीडीआर घेता येईल. तो बँक गॅरंटीच्या मुल्याएवढाच असला पाहिजे. तसेच तो एफडीआर/टीडीआर अभिकर्ता संस्थेच्या नावे व पुरेशा कालावधीचा आणि अभिकर्ता संस्थेच्या ताब्यामध्ये असावा.

१६) धानाचा /सी.एम.आर. चा अपहार झाल्यास किंवा धानाची उचल, भरडाई व सी.एम.आर. जमा करण्यास विलंब झाल्यास भरपाई वसूल करण्याची कारवाई अभिकर्ता संस्थांनी जागरुकतेने वेळीच करावी, असे न झाल्यास संबंधितांना व्यक्तिगत जबाबदार धरण्यात येईल.

१७) सी.एम.आर. जमा करताना तूट आल्यास, सी.एम.आर. च्या ठरविलेल्या दरापेक्षा सव्वापट रक्कम अभिकर्ता संस्थांनी गिरणीमालकांकडून वेळीच वसुल करुन शासनाकडे भरावी.

१८) सन २०१९-२०२० या हंगामात धान भरडाईसाठी दि.३१ जुलै, २०२० पर्यंत मुदत विहित करण्यात आली आहे. भरडाईमध्ये होणारा विलंब टाळण्याच्या दृष्टीने खरेदी पाठोपाठ भरडाईच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात यावी. शासन स्तरावरुन कोणत्याही परिस्थितीत वाढीव मुदतीसाठी केंद्राकडे विनंती करण्यात येणार नाही, या बाबींचा अत्यंत गांभिर्याने विचार करुन दिलेल्या मुदतीतच भरडाई पूर्ण करुन सी.एम.आर. संबंधित गिरणीमालकामार्फत विहित शासकीय गोदामात जमा करणे बंधनकारक राहील.

१९) धान भरडाईचे काम विहीत कालावधीत पूर्ण करण्यात न आल्यास अशा गिरणीमालकासमवेत करण्यात आलेला करारनामा रद्द करण्याचे पूर्ण अधिकार अभिकर्ता संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालकांना राहतील. गिरणीमाकासमवेत झालेला करारनामा रद्द करताना इसारा रक्कम व अनामत रक्कम जप्त करुन अभिकर्ता संस्थांनी तात्काळ शासन जमा करावी. तसेच, गिरणीमालकाकडे शिल्लक असलेल्या धानाची व सी.एम.आर. ची रक्कम संबंधित गिरणीमालकाच्या बँक गॅरंटीतून वसूल करुन शासन जमा करावी.

२०) खरेदी अभिकर्ता संस्थांनी धान भरडाई गिरण्यांना वेळोवेळी भेटी देवून भरडाई कामाची तपासणी करावी व परिणामकारक नियंत्रण ठेवावे. जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी किंवा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सुध्दा वेळोवेळी झालेल्या कामाचा आढावा घ्यावा.

२१. त्यांच्याशी निगडीत असलेली माहिती NeML पोर्टलवर अद्ययावत करावी. सदर माहिती पोर्टलवर ऑनलाईन अद्ययावत न केल्यास गिरणीधारक/ अभिकर्ता संस्था यांना कोणतेही देयक वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाकडून अदा करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे अभिकर्ता संस्थांनी PFMS पोर्टलवर त्यांच्याशी संबंधित सर्व माहिती अद्ययावत करावी.

सर्वसाधारण सूचना -

१) तांदूळ लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये वितरित केल्यानंतर दरमहा प्रमाणपत्रे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने वित्तीय सल्लागार व उपसचिव ,मुंबई यांच्या कार्यालयास सादर करावीत. (नमूना जोडपत्र -६ मध्ये पहावा.)

२) सीएमआर जमा करण्यासाठी भाडयाने घेतलेल्या गोदामामध्ये एकदा साठा केलेला सीएमआर २ महिन्यापेक्षा अधिक काळ सदर गोदामात राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

३) सीएमआरच्या साठवणूक व वितरणाच्या कार्यवाहीबाबत स्वतंत्रपणे निदेश देण्यात येतील.

४) तांदळाचे प्रत्यक्ष लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील वितरण व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सादर करावे.

५) शासनाने विहित केलेले गोदाम व शासकीय गोदाम येथील गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राहील.

वरील शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर असून त्याचा संकेतांक २०१९११०८१७०६२४५९०६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Food and Civil Supply, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, serialNumber=ae91c22a99adbafeb91e1127b17cef54d9c48672dc90ac9562ba7f619961cbbb, cn=Satish Shridhar Supe
Date: 2019.11.08 17:09:56 +05'30'

(सतिश सुपे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्रे:- जोडपत्र १ ते ६

प्रति,

१) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ,कनमुर हाऊस, मुंबई-४०० ००१.
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., आदिवासी विकास भवन,जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००१.
३) जिल्हाधिकारी, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे,पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा मुंबई.
५) जिल्हा पुरवठा अधिकारी,नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.
६) सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे,पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.
७) सर व्यवस्थापक (महाराष्ट्र) ,भारतीय अन्न महामंडळ, ५ वा माळा, दत्तपाडा रोड, राजेंद्र नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई-४०००६६
८) उपआयुक्त (पुरवठा), सर्व विभाग.

<u>प्रत माहितीसाठी अग्रेषित :-</u>

१) मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद
२) सर्व विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य.
३) अपर मुख्य सचिव, (पणन), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),

७) खाजगी सचिव, मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण), मंत्रालय, मुंबई-३२.
८) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, (प्रत्येकी ५ प्रती),
९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय ६ वा मजला, विधानभवन, मुंबई. (१० प्रती)
१०) संचालक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई
११) संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक

जोडपत्र क्रमांक -१

धान/तांदुळ वाहतुकीचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र

अ.	जिल्हयाचे नाव	धान खरेदी केंद्राचे नाव	भरडाई केंद्राचे नाव	डिओ. क्र.व दिनांक	टि.पी. क्र. व दिनांक	भरडाईसाठी दिलेला निव्वळ भात (क्विं.)	खरेदी केंद्र ते मिल पर्यंतचे अंतर	८ किमी पेक्षा कमी असणाऱ्या वाहतूकीसाठी दर (रु./क्विं.)	८ किमी पेक्षा कमी असणाऱ्या वाहतूकीची रक्कम	८ किमी पेक्षा जास्त असणाऱ्या वाहतूकीसाठी दर (रु./क्विं.)	८ किमी पेक्षा जास्त असणाऱ्या वाहतूकीचे अंतर (कि.मी.)	८ किमी पेक्षा जास्त असणाऱ्या वाहतूकीची रक्कम	एकूण वाहतूकीची निव्वळ देय रक्कम (रु.)
	१	२	३	४	५	६	७	८	९=६*८	१०	११	१२=६*१०*११	१३=९+१२

जोडपत्र-२

कलर कोडिंग - पणन हंगाम २०१९-२० खरीपसाठी

महाराष्ट्र शासन

तात्काळ/ महत्वाचे

क्रमांक : संकीर्ण-२६१९/४७२/प्र.क्र.१०८/नापु-२९
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार इमारत, दुसरा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ जून, २०१९.

प्रति,

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.,कनमूर हाऊस,नरसी नाथा स्ट्रीट,मुंबई-४०० ००९.
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, नाशिक-२.
३) महा व्यवस्थापक (महाराष्ट्र) भारतीय अन्न महामंडळ,५ वा माळा, दत्तपाडा रोड, राजेंद्र नगर, बोरीवली (पुर्व), मुंबई -४०००६६.
४) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).

विषय :- खरीप पणन हंगाम २०१९-२० मध्ये "Blue Colour Coding" केलेल्या गोण्याचा वापर करण्याबाबत.

संदर्भ :- भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. 15(1)/2012-PY-III(E File.318639) Dated 08th May, 2019.

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधीन पत्रान्वेय केंद्र शासनाने "खरीप पणन हंगाम २०१९-२०" साठी निळया रंगाचे कोडींग केलेल्या (BLUE Colour Coding) गोण्यांचा वापर करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे)

२. तरी केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे खरीप पणन हंगाम २०१९-२० मध्ये गोण्यांच्या कलर कोडींगबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र : वरीलप्रमाणे

(नि. ज. मारोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी:-

१) सर्व विभागीय आयुक्त,
२) सर्व उप आयुक्त (पुरवठा)
३) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
४) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
६) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
७) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
८) कार्यासन नापु.२९ संग्रहार्थ.

Scanned with CamScanner

No.15(1)/2014 [illegible]
Government of India
Ministry of Consumer Affairs, Food & Public Distribution
Department of Food & Public Distribution
(Policy-[illegible] Section)

Krishi Bhawan, New Delhi
Dated, [illegible]

To
The Secretary,
Food & Civil Supplies Department,
Government of Andhra Pradesh, [illegible] Bihar, Chhattisgarh, [illegible] Gujarat, Haryana, Himachal Pradesh, Jammu & Kashmir, Jharkhand, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, [illegible] Nagaland, [illegible], Odisha, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Telangana, [illegible], Uttar Pradesh, West Bengal, Andaman & Nicobar Islands, Chandigarh, Delhi, [illegible], Puducherry.

Sub: Colour Coding of Gunny Bags to facilitate identification of crop year of stock for KMS 2019-20

Sir/Madam,

I am directed to say that it has been decided with the approval of Competent Authority to adopt BLUE colour coding for gunny bags for KMS 2019-20. The colour coding will be in the manner as indicated below [illegible]

a. Stencil or Branding as per [illegible] requirements shall be in "BLUE" colour.
b. Marking or stitching on the mouth of the [illegible] after filling the grain will be done by the FCI/State Agencies in "BLUE" [illegible].
c. For identification [illegible] [illegible] there will be Colour [illegible] [illegible]

(a) Bags to be supplied through Jute Commissioner of India.

[illegible] Single [illegible] [illegible] to be supplied through [illegible] Jute Commissioner of India [illegible]

[illegible] and Karnataka [illegible] [illegible] will be [illegible] on each bag [illegible] [illegible] mm away from [illegible] of the bag.

(b) Bags not purchased through Jute Commissioner of India

For jute bags not purchased through [illegible] [illegible] be printed on each bags [illegible] [illegible] mm away from the respective [illegible]

Yours faithfully,
[illegible]
(Devendra S. [illegible])
Deputy Secretary (Py-[illegible])
Tel: [illegible]

३९०९
(९६२५) २८
२१८८/१९
न.प्रत
१२-९-१९
Scanned with CamScanner

जोडपत्र-३

(खरीप हंगाम २०१९-२० मध्ये खरेदी करावयाच्या भाताचे (धानाचे) विनिर्देश)

ANNEXURE-"I"

UNIFORM SPECIFICATIONS OF ALL VARIETIES OF PADDY

(KHARIF MARKETING SEASON 2019-20)

Paddy shall be in sound merchantable condition, dry, clean, wholesome of good food value, uniform in colour and size of grains and free from moulds, weevils, obnoxious smell, *Argemone mexicana, Lathyrus Sativus* (Khesari) admixture of deleterious substances.

Paddy will be classified into Grade 'A' and 'Common' groups.

SHEDULE OF SPECIFICATION

Sr. No.	Refractions	Maximum Limits (%)
१	Foreign matter a) Inorganic b) Organic	 1.0 1.0
२	Damaged, discoloured, sprouted and weevilled grains	5.0*
३	Immature, Shrunken and shrivelled grains	3.0
४	Admixture of lower class	6.0
५	Moisture content	17.0

* Damaged, sprouted and weevilled grains should not exceed 4%

<u>N.B.</u>

१. The definitions of the above refractions and method of analysis are to be followed as per BIS 'Method of analysis for foodgrains' Nos. IS: 4333 (Part-I) : 1996, IS : 4333 (Part-II) : 2002, and ''Terminology for foodgrains'' IS: Nos. 2813 - 1995, as amended from time to time.

२. The method of sampling is to be followed as per BIS method for sampling of Cereals and Pulses IS: 14818 - 2000 as amended from time to time.

३. Within the overall limit of 1.0% for organic foreign matter, poisonous seeds shall not exceed 0.5% of which Dhatura and Akra seeds (*Vicia* species) not to exceed 0.025% and 0.2% respectively.

******

जोडपत्र-४

(खरीप हंगाम २०१९-२०२० मध्ये खरेदी करावयाच्या तांदूळाचे विनिर्देश)

UNIFORM SPECIFICATION FOR GRADE 'A' & 'COMMON' RICE

(KHARIF MARKETING SEASON 2019-2020)

Rice shall be in sound merchantable condition, sweet, dry, clean, wholesome, of good food value, uniform in colour and size of grains and free from moulds, weevils, obnoxious smell, admixture of unwholesome poisonous substances, *Argemone maxicana* and *Lathyrus sativus* (Khesari) in any form, or colouring agents and all impurities except to the extent in the schedule below. It shall also conform to prescribed norms under food Safety & Standards Act, 2006/ Rules prescribed here under:

SCHEDULE OF SPECIFICATION

sr.no	Refractions		Maximum limit (%)	
			Grade A	Commom
1	Brokens*	Raw	25.00	25.00
		Parboiled/single parboiled rice	16.0	16.00
2	Foreign matter **	Raw/ Parboiled/single parboiled rice	0.5	0.5
3	Damaged#/Slightly Damaged Grains	Raw	3.0	3.0
		Parboiled/single parboiled rice	4.0	4.0
4	Discoloured Grains	Raw	3.0	3.0
		Parboiled/single parboiled rice	5.0	5.0
5	Chalky Grains	Raw	5.0	5.0
6	Red Grains	Raw/ Parboiled/single parboiled rice	3.0	3.0
7	Admixture of lower class	Raw/ Parboiled/single parboiled rice	6.0	-
8	Dehusked Grains	Raw/ Parboiled/single parboiled rice	13.0	13.0
9	Moisture content @	Raw/ Parboiled/single parboiled rice	14.0	14.0

* Not more than 1% by weight shall be broken.

** Not more than 0.25% by weight shall be mineral matter and not more than 0.10% by weight shall be impurities of animal origin.

including pin point damage grains.

@ Rice (both raw and parboiled) can be procured with moisture content upto a maximum limit of 15% with value cut. There will be no value cut up to 14%. Between 14% to 15% moisture, value cut will be applicable at the rate of full value.

****

NOTES APPLICABLE TO THE SPECIFICATION OF GRADE 'A' AND COMMON VARIETIES OF RICE

1. The definition of the above refractions and method of analysis are to be followed as given in Bureau of Indian Standard "Method of analysis for Foodgrains" No. IS: 4333(Part-I) 1996 and IS: 4333(Part-II) 2002 and ‘‘Terminology for foodgrains’’ IS: 2813-1995 as amended from time to time. Dehusked grains are rice kernels whole or broken which have more than 1/4 th of the surface area of the kernel covered with the bran and determined as follows:-

ANALYSIS PROCEDURE: - Take 5 grams of rice (sound head rice and brokens) in a petri dish (80 X 70mm). Dip the grains in about 20 ml. of Methylene Blue solution (0.05% by weight in distilled water) and allow to stand for about one minute. Decant the Methylene Blue solution. Give a swirl wash with about 20 ml. of dilute hydrochloric acid (5% solution by volume in distilled water). Give a swirl wash with water and pour about 20 ml. of Metanil Yellow solution (0.05% by weight in distilled water) on the blue stained grains and allow to stand for about one minute. Decant the effluent and wash with fresh water twice. Keep the stained grains under fresh water and count the dehusked grains. Count the total number of grains in 5 grams of sample under analysis. Three brokens are counted as one whole grain.

CALCULATIONS:

$$\text{Percentage of Dehusked grains} = \frac{N \times 100}{W}$$

Where N = Number of dehusked grains in 5 grams of sample

W = Total grains in 5 grams of sample.

2. The Method of sampling is to be followed as given in Bureau of Indian Standard "Method of sampling of Cereals and Pulses" No. IS: 14818-2000 as amended from time to time.

3. Brokens less than 1/8th of the size of full kernels will be treated as organic foreign matter. For determination of the size of the brokens average length of the principal class of rice should be taken into account.

4. Inorganic foreign matter shall not exceed 0.25% in any lot, if it is more, the stocks should be cleaned and brought within the limit. Kernels or pieces of kernels having mud sticking on surface of rice, shall be treated as Inorganic foreign matter.

5. In case of rice prepared by pressure parboiling technique, it will be ensured that correct process of parboiling is adopted i.e. pressure applied, the time for which pressure is applied, proper gelatinisation, aeration and drying before milling are adequate so that the colour and cooking time of parboiled rice are good and free from encrustation of the grains.

STANDARDS OF RISE FOR ISSUE TO STATE GOVERNMENTS/UT ADMINISTRATIONS FOR DISTRIBUTION UNDER TPDS AND OTHER WELFARE SCHEMES.

Guidelines for issue/ disposal of wheat and rise have been issued vide Departments letter no. 8-2/98-DR III dated 27.01.1998 and 13.11.1998. Gist of standards of rise for issue to states / UTs for distribution under TPDS and OWSs alongwith undated illustrations for KMS 2018-19 is as under :

1. Ready issuable stocks are fit for human consumption which should conform the standards of Food Safety and Standards Act and Rules framed there under.

2. Rise stocks falling within A, B and C categories (categorization is best on damaged and discoloured grains) confirming to food safety norms and free from insect infestation are ready stocks. Ready stocks may be issued under TPDS and OWSs provided the refractions in respect of broken grains, chalky grains, red grains and dehusked grains are upto 20% in excess of the uniform specifications.

Illustration of maximum permissible parameters of ready to issue stocks of rise based on uniform specifications for KMS 2018-19 is as under:

sr.no	Refractions		Maximum limit (%) as per uniform specifications for Grade A & Common	Maximum permissible limit (%) for Grade A & Common
1	Damaged#/Slightly Damaged Grains/Pin-point Damaged grains	Raw	3	5
		Parboiled/single parboiled rice	4	5
2	Discoloured Grains	Raw	3	7
		Parboiled/single parboiled rice	5	7
3	Broken	Raw	25	30
		Parboiled/single parboiled rice	16	19
4	Chalky Grains	Raw	5	6
5	Red Grains	Raw/ Parboiled/single parboiled rice	3	4
6	Dehusked Grains	Raw/ Parboiled/single parboiled rice	13	16
7	Foreign matter **	Raw/ Parboiled/single parboiled rice	0.5	1.0

२१

जोडपत्र - ५

U.K.S. Chauhan, *IAS*
Joint Secretary (Policy&FCI)
Ph. No.: 2338 2512
Fax No.: 2338 9358
Email: jspolicy.fpd@nic.in

संयुक्त सचिव
भारत सरकार
उपभोक्ता मामले, खाद्य और सार्वजनिक वितरण मंत्रालय
खाद्य और सार्वजनिक वितरण विभाग
कृषि भवन, नई दिल्ली - 110001
JOINT SECRETARY
GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF CONSUMER AFFAIRS,
FOOD & PUBLIC DISTRIBUTION
DEPARTMENT OF FOOD AND PUBLIC DISTRIBUTION
KRISHI BHAWAN, NEW DELHI-110001

D.O.No.17(16)/2013-Py.I

October 7, 2013

Dear Mr. Deepak,

As you are aware, there are gaps in the flow of information about the procurement operations on day-to-day basis in various States in a particular season, which results in reporting of incorrect data of Central Pool procurement at various levels.

2. To overcome this problem, this Department has requested FCI to evolve an online procurement monitoring system (OPMS) for reporting and monitoring of procurement operations for wheat, paddy and coarse grains in the country on daily basis. Following data is planned to be managed through OPMS-

I	**District level data** (to be filled by Revenue District Level Officers of various state agencies and Area Managers of FCI)
(i)	Commodity-wise total quantity procured in various Revenue Districts by each state agency or FCI on daily basis
(ii)	Commodity-wise quantity of procured stock of each commodity handed over to FCI in various Revenue Districts by the concerned state agency on daily basis (delivery of CMR in the case of procurement of paddy)
(iii)	Delivery of levy rice to FCI/state nodal agency by the millers in various Revenue Districts on daily basis (to be reported by the Area Managers or Revenue District-level Officers of the concerned state nodal agency)
(iv)	Entry of historical data of procurement for various commodities for previous two seasons, Revenue District-wise
II	**Data entry at State Level**
(i)	Names, addresses and details of contact persons of various state agencies involved in procurement operations in the State (one-time entry to be updated from time to time)
III	**Report generation**
	Software system should facilitate generation of following kinds of reports
(i)	District-level reports of procurement of each commodity by various agencies including FCI
(ii)	State-level reports of Revenue District-wise and agency-wise progress of procurement for various commodities
(iii)	Comparative reports on procurement operations for various commodities for the current and two previous years, Revenue District-wise
(iv)	Generation of national-level reports regarding on-going procurement operations for various commodities, state-wice and also comparative reports on procurement for the current season and two previous seasons

Contd/-

एच-९३[५००-११-२०१५]-११

२२

: 2 :

3 It is planned that to begin with, the Area Managers of FCI will be feeding the data pertaining to all State Government agencies as well as of FCI on OPMS on day-to-day basis. For this purpose, it would be necessary that all the State agencies of your State, involved in procurement of wheat, paddy or coarse grains, designate one officer as Nodal Officer in each revenue District in the area of their operations and instruct that Nodal Officer to provide all required data through e-mail/fax or over phone to the concerned Area Manager of FCI on day-to-day basis so that data is continuously updated in OPMS without break or time lag. As operations of KMS 2013-14 have started, it is requested that immediate instructions may be given to all State agencies in this regard and they should immediately start providing required information to the Area Managers of FCI. In case there is any backlog of data for the current KMS, that may also be kindly provided by the Nodal Officers of the State procurement agencies to the Area Managers of FCI for making entries in OPMS.

4. In the next phase, we will be enabling the Nodal Officers of the State Government agencies themselves to feed the data in OPMS on day-to-day basis. For that purpose, a list of these Nodal Officers will be prepared and they will be provided login ID and password by NIC.

5. Considering the importance of the matter, your immediate attention and kind cooperation is solicited in this regard.

With regards,

Yours sincerely,

(U.K.S. Chauhan)

Shri Deepak Kapoor
Food Secretary,
Government of Maharashtra,
Department of Food & Public Distribution
Mantralaya Annexe,
Mumbai - 400032

एच-१७३३ -११अ

२२

MOST IMMEDIATE

No.192(29)/2007-FC.A/cs
Government of India
Ministry of Consumer Affairs, Food and Public distribution
Department of Food and Public Distribution

Krishi Bhavan, New Delhi
Dated the August 19, 2015

To

(1) The Principal Secretary/Secretary,
Food & Civil Supplies Department,
Governments of Andhra Pradesh, Assam, Bihar, Telangana, Chhattisgarh, Gujarat, Jharkhand, Karnataka, Kerala, Madhya Pradesh, Maharashtra, Orissa, Punjab, Rajasthan, Tamil Nadu, Uttar Pradesh, Uttarakhand and West Bengal.

(2) CMD, FCI, New Delhi

Subject: Procedure for submission of accounts, audited by auditors appointed by C&AG by State Governments in order to finalize procurement incidentals of State Agencies and economic cost of rice, wheat and coarse grains for the past years

Madam/Sir,

I am directed to refer to this Department's letter of even number dated 06.12.2008 and 16.09.2010 on the above subject vide which procedure for submission of final claims by the States and time limit for sending FCI's comments thereon was fixed to avoid delay and expedite finalization of accounts. Subsequently, keeping in view the inconvenience being faced by some State Governments and also simplify the procedure for expeditious submission of proposal for fixation of final rate of procurement incidentals/economic cost vide Joint Secretary(Policy & FCI)'s D.O. letter of even number dated 27.12.2013, proforma was partially modified to enable the States to submit the information expeditiously. Further, vide letter of even number dated 25.2.2015, State Governments were informed that the proforma circulated vide letter dated 27.12.2013 will be effective from prospective date.

2. Subsequently, while finalizing the proposals of some States, it has been observed that the documents required to be submitted along with proposal for fixation of final rate of procurement incidentals/economic cost still requires further modification. Similarly, it has also been observed that in case of heads like administrative charges, the items which should be booked or not to be booked are not quite clear. Accordingly, matter has been further examined in the Department and it has been decided to circulate a list indicating the documents which must be submitted along with the proposal to enable PI Cell of this Department to examine the proposal expeditiously and recommend realistic rates of various items of procurement incidentals. A list of documents required to be submitted along with the proposals (**Annex-I**) along with an illustrative list of items

एच-१७३३-१२

२४

114

which should be booked and not to booked under the head "Administrative Charges" is given at **Annex-II**. It may be noted that the list of documents is not exhaustive and, whenever required to prove the veracity of a claim, production of more documents will be insisted upon by the Department.

3. All State Governments are requested to strictly follow the guidelines given in para 2 above and issued earlier from time to time while submitting their proposals for fixation of final rates of procurement incidentals/economic cost.

4. While examining the proposals and sending their comments to this Department, all Regional Offices of FCI and FCI Headquarters are also requested to ensure that the proposals to be submitted by the State Governments in future should be in accordance with aforesaid instructions.

Yours faithfully,

(Manoj Kr. Gupta)
Director
Tel.No.011-2338 9436
Fax No.011-2338 9358

Copy to: ED (Proc), FCI HQ, New Delhi with a request to circulate it to all ED (Zones)/GM (Regions) for strict adherence to the above procedure.

एच-१७३३ -१३अ.

तांदुळ विश्लेषण अहवाल

(ANALYSIS REPORT OF RICE)

दिनांक:-

भाग "अ"

मानके (REFRACTION)	टक्केवारी (PERCENTAGE)
१. तुटलेले दाणे (Brokens)	
अ) १/८ ते १/४ पर्यंत (Over १/८ the to below १/८)	
ब) १/४ ते ३/४ पर्यंत	
२. अन्य घटक (Foreign Matter)	
अ) सेंद्रिय (Organic)	
ब) असेंद्रिय (Inorganic)	
३. क्षतिग्रस्त दाणे (Damaged Grains)	
४. रंगहिन दाणे (Discolored Grains)	
५. पांढरके दाणे (Chalky Grains)	
६. लाल दाणे (Red Grains)	
७. कमी दर्जाचे मिश्रीत दाणे (Admixture of lower Classes)	
८. छिलका असलेले दाणे (Husky Grains)	
९. ओलावा (Moisture Content)	

भाग "ब"

१. भात गिरणीचे नाव व पत्ता :-...
२. गुणवत्ता तपासणी केलेल्या तांदुळाचे एकुण पोते व वजन...
३. स्विकृती पावती क्रमांक व दिनांक..

(स्वाक्षरी)

गुणवत्ता नियंत्रक तथा

प्राधिकृत उचल/वाहतुक प्रतिनिधी

जिल्हा..................................

क्रमांक-.........

तांदुळ स्विकृती पावती

संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक

दिनांक:- / /

A. हंगाम :-
B. यंत्रणेचे नाव :-
C. जिल्हा :-
D. भात गिरणीचे नाव व पत्ता :-

अ.क्र.	तारीख	वाहन क्रमांक	गुणवत्ता तपासणी दिनांक	ज्या गोदामात तांदुळ पाठविण्यात आला त्या गोदामाचे नाव	तांदळाची प्रत	एकुण बारदाना संख्या	तांदळाचे निव्वळ वजन क्विंटल	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९

प्रमाणित करण्यात येते की, वर दर्शविलेली बारदाना संख्या ....एवढी असुन प्रती बारदाना वजन ५८० ग्रॅम प्रमाणे एकुण बारदान्याचे होणारे वजन .... कमी करुन तांदळाचे निव्वळ वजन दर्शविले आहे.

गिरणी मालकाचे नाव
व सही

जिल्हापुरवठा अधिकारी........
यांचे प्राधिकृत प्रितिनिधीचे
नाव व सही

जोडपत्र-६

प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की,

१. आधारभूत किंमत योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या धानाची भरडाई करुन प्राप्त CMR पैकी माहे --------------- ,२०१७ मध्ये ---------------------- मे.टन CMR वितरित करण्यात आला आहे.

२. उपरोक्त नमूद केलेला सीएमआर हो गुणवत्ता तपासणी करुन घेण्यात आला असून एफ ए क्यु दर्जाचा आहे.

३. सदर CMR महाराष्ट्र शासन व अन्न व सार्वजनिक वितरण विभाग, भारत सरकार मधील सामंजस्य करारानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना, अंत्योदय योजना, इतर कल्याणकारी योजनेच्या लाभार्थ्यांनाच वितरित करण्यात आला आहे.

४. तसेच, उपरोक्त नमूद परिमाण हे पूर्णत : DCP अंतर्गत प्राप्त CMR चे असून यात भारतीय अन्न महामंडळाकडून उचल केलेल्या तांदूळाचा समसावेश नाही.

५. सदर तांदूळ हा बंदिस्त गोदामात साठवणूक करण्यात आलेला होता.

जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी

<u>जोडपत्र - ७</u>

महाराष्ट्र शासन

तातडीचे

क्र.विसउस/का.२/खरेदी/२०१९-२०/
वित्तीय सल्लागार व उपसचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
जी.टी.रुग्णालय परिसर,नविन मंत्रालय इमारत,
८ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-१
दू.ध्व. २२६१६८२५/२३ .
ईमेल- fadsmumbai.mhpds@gov.in
दिनांक १९ ऑगस्ट २०१९.

प्रति,

१. व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.
नाशिक.

२. व्यवस्थापकीय संचालक,
दि महाराष्ट्र स्टेट को-आपॅरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई.

विषय: किमान आधारभूत किंमत हंगाम २०१९-२० मध्ये धान/भरडधान्य बारादाना खरेदी व वापराबाबत मार्गदर्शक सूचना.
संदर्भ: केंद्र शासनाचे पत्र क्र. १५-१४/२०१८-Py.III Dated १३ Dec. २०१८.

हंगाम २०१८-१९ मध्ये बारदाना खरेदीमध्ये येणाऱ्या अडचणी व निविदा प्रक्रीयेव्दारे बारदाना खरेदीस लागणारा विलंब व होणारा खर्च विचारात घेता बारदाना खरेदी थेट केंद्र शासनामार्फत करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. त्या अनुषंगाने सदरहू हंगामात मार्कफेडच्या मागणीनुसार १०९२० बेल्स एवढी खरेदी करण्यात आलेली आहे.

हंगाम २०१९-२० करीता १६००० बेल्सची मागणी केंद्र शासनाकडे यापूर्वीच नोंदविण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. दोन्ही अभिकर्ता संस्थांनी नवीन बारदान्याची खरेदी आपल्या स्तरावर करुन नये, तसे केल्यास त्याची कुठलीही प्रतिपुर्ती आपणास मिळणार नाही.

२. संदर्भांकित केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे १५० कि.ग्रॅ. धान खरेदीस ४ बारदाना वापरण्यात यावा या ४ पैकी २ नवीन बारदान्याचा वापर करावा तर २ जुन्या बारदान्याचा वापर करावा.

३. १५० कि.ग्रॅ धानापासून १०० कि.ग्रॅ. सीएमआर तयार होतो त्यासाठी मुद्दा क्र. २ मध्ये वापरण्यात आलेल्या २ नवीन बारादान्याचा सीएमआर भरण्यासाठी पुन्हा वापरण्यात यावा. उर्वरित २ बारदाना धान भरण्यासाठी योग्य असल्यास त्याचा धान खरेदीसाठी पुन्हा वापर करण्यात यावा

L115

किंवा सदरचा बारदाना धान भरण्यायोग्य नसल्यास त्याची निविदेव्दारे विक्री करुन त्याच्या विक्रीतून येणारी रक्कम शासनास जमा करावी.

४. भरडधान्याकरीता १०० कि.ग्रॅ. ला २ या हिशोबाने २ नवीन बारदान्याचा वापरण्यात यावा.

५. नवीन बारदाना केंद्र शासनामार्फत पुरविण्यात येणार आहे. यास्तव, आपण फक्त जुन्या बारदान्याच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रीयेचा अवलंब करावा.

६. हंगाम २०१८-१९ मध्ये काही नवीन बारदाना शिल्लक असल्यास तो बारदाना परत हंगाम २०१९-२० मध्ये वापर करण्याकरीता केंद्र शासनाची मंजूरी आवश्यक आहे. यास्तव, असा किती बारदाना आपल्याकडे शिल्लक आहे व तो नवीन हंगामात वापरला जाणार आहे याची माहिती तात्काळ शासनास सादर करावी. जेणेकरुन त्या शिल्लक बारादान्याचा नवीन हंगामामध्ये वापर करता येईल. केंद्र शासनाच्या परवाणगी शिवाय शिल्लक बारदाना नवीन हंगामात वापरल्यास व त्याची प्रतिपुर्ती केंद्र शासनाने न केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी अभिकर्ता संस्थावर राहील.

७. मुद्दा क्र. ६ मधील बाबीचा आढावा घेतल्यावर चालू हंगाम म्हणेज २०१९-२० मध्ये आपणास किती बारदाना कोण-कोणत्या महिन्यात लागणार आहे व तो कोणत्या ठिकाणी उतरावयाचा आहे त्याच्या जवळील रेल्वे रेकबाबतची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात भरुन दिनांक २६.८.२०१९ पर्यंत शासनास सादर करावी.

८. बारदाना खरेदी, वापर, त्याचा पुनर्वापर, कलर कोडींग व त्याचे लेखे ठेवणे याबाबतचे केंद्र शासनाच्या निर्देशांचे पालन व्हावे व त्याचा हिशोब हंगाम संपल्यानंतर सहा महिन्याच्या आत शासनास सादर करण्यात यावा.

(स.कि. उबाळे)
वित्तीय सल्लागार व उपसचिव

सोबतः विवरणपत्र नमुना.

जिल्हानिहाय बारदाना प्रमाणपत्र-:

अ.क्र	जिल्हा	महिना	गोदाम	बारदाना परिमाण	नजीकचा रेल रॅक	रेल रॅकपासुनचे गोदाम अंतर